लघुवाद न्यायालय, मुंबई
लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२
दूरध्वनी क्रमांक :– २२०८८७००/२२०८८७४९
ई-मेल : scc-mumbai@bhc.gov.in

–: जाहीर निविदा :–

लघुवाद न्यायालय, मुंबई लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२ येथील मुख्य कार्यालय तसेच वांद्रे शाखा येथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना (१३० नग) छत्र्या खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकाने आपली दरपत्रके दिलेल्या अटी व शर्तीनुसार मोहोरबंद लखोट्यात भरून या कार्यालयास जमा करावी.

तरी इच्छुक दरपत्रकधारकांनी आपले दरपत्रक मोहोरबंद लखोटयात भरुन त्या लखोट्याच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"छत्र्या खरेदीसाठीचे दरपत्रक"** असे लिहुन ते **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई– ४०० ००२"** या ठिकाणी **दिनांक २३ जुलै, २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. सदर जाहीर दरपत्रकाची सविस्तर माहिती लघुवाद न्यायालय मुंबई यांच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. http://districts.ecourts.gov.in/india/maharashtra/mumbai-smallcause-court/tender.

जाहीर दरपत्रक स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा/नाकारण्याचा अंतिम अधिकार हा मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना असेल.

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
}
दिनांक : १४ जुलै, २०२६ }

(आर. एल. पोतदार)
अप्पर प्रबंधक

लघुवाद न्यायालय, मुंबई

लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२

–: दरपत्रक सुचना :–

दिनांक – १४ जुलै, २०२६

मुख्य कार्यालय तसेच वांद्रे शाखा येथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी छत्र्या खरेदी करण्यासाठी जाहीर दरपत्रके सादर करण्यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

१.	इच्छुक संस्था/कंपन्यानी आपले दरपत्रक विहित नमुन्यात व वस्तूंच्या पुर्ण माहितीसह मोहरबंद लखोटयात सादर करून त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"छत्र्या खरेदीसाठीचे दरपत्रक"** असे लिहून ते **'प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई ४०० ००२'** यांच्याकडे **दिनांक २३ जुलै, २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवावे.** तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२.	सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम–२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व सुरक्षा ठेव रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क रूपये २,०००/– (विना परतावा) व सुरक्षा ठेव रक्कम रूपये १०,०००/– (परतावा योग्य व्याजरहीत) या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर देणे गरजेचे आहे. सदर डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर हे **''प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई"** यांच्या नावे द्यावयाचा आहे.
३.	दरपत्रकधारकाने दरपत्रक भरतांना सर्व करांसहीत (With All G.S.T.) रक्कम नमूद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलवार दरपत्रकात नमूद करावी.
४.	समितीच्या बैठकीत दरपत्रके उघडण्याच्या वेळेस दरपत्रक धारकांनी आपल्या दरपत्रकात नमुद केलेल्या छत्रीचा नमुना (Sample Piece) पडताळणीसाठी कार्यालयात घेऊन येणे बंधनकारक राहील. **दरपत्रकधारकांनी चांगल्या प्रतीच्या फुल साईज छत्र्यांचे दर दरपत्रकात नमूद करणे अनिवार्य आहे.**
५.	दरपत्रकधारकारने दरपत्रकावर संस्था/कंपनीचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ई–मेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.
६.	दरपत्रक धारकांची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी झालेल्या दरपत्रकातील दरानुसार सदरची खरेदी करण्यात येईल. तसेच ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच खरेदी होईल आणि निवड झाल्यानंतर वस्तूंचा पुरवठा पुढील १५ दिवसात करणे आवश्यक आहे. १५ दिवसात पुरवठा न झाल्यास सदर निवड झालेल्या संस्था/कंपनीला रद्द करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या संस्था/कंपनीकडून खरेदी केलेल्या वस्तू पुरवठा झाल्यावर वस्तू सुस्थितीत आहे की नाही याची तपासणी करून सुरक्षा ठेव रक्कम १० दिवसानंतर परत करण्यात येईल.

७.	छत्र्यांची गुणवत्ता आणि किंमती पडताळणीचे पूर्ण अधिकार खरेदी समितीला राहतील. छत्र्यांची किंमत कमी असेल परंतू छत्र्यांची गुणवत्ता चांगली नसल्यास सदर छत्र्या नाकारण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील. तसेच, वस्तूंची संख्या कमी अधिक करण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील.
८.	छत्र्यांचा स्वीकार करतांना जर छत्र्यांमध्ये काही त्रुटी म्हणजेच तुटलेले अथवा वस्तूंचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास, त्या छत्र्या परत देण्यात येतील व त्याऐवजी उत्तम दर्जाच्या नवीन छत्र्यांचा पुरवठा पुरवठादारास देणे बंधनकारक राहिल.
९.	दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश (Cancelled Cheque) तसेच बँकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकीत प्रत देणे अनिवार्य आहे.
१०.	दरपत्रक मंजूर झालेल्या संस्थेने सदरच्या छत्र्या या न्यायालयातील मुख्य कार्यालयात व वांद्रे शाखा येथे विना वाहतूक शुल्क पोच करावयाच्या आहेत.
११.	मा. मुख्य न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
}
दिनांक : १४ जुलै, २०२६ }

RPotdar

(आर. एल. पोतदार)
अप्पर प्रबंधक